**उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**
**ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जुनी जिल्हा परिषद परिसर, होन्डा शो रुम समोर, वाशिम**
दुरध्वनी:- ०७२५२-२३५३७४

**सहाय्यता गटांचे अभिलेखे छपाई बाबत इच्छुक पुरवठादारांकडुन अर्ज मागविण्याबाबत.**

ग्रामीण भागातील दारिद्रयाचे निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातुन दिनदयाळ अंत्योदन योजना (राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची) सुरुवात केली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाची अंमलबजावणी जिल्हा स्तरावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्यामार्फत करण्यात येते. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम अंतर्गत स्वयंसहाय्यता गटांसाठी लागणारे अभिलेखे छपाई करणे आहे. त्याकरीता प्रिंटिगचा व्यवसाय करणा-या व्यवसायिकांकडून मर्यादित ई- निविदा (Limited e- tender) या खरेदी प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येणार आहे. सदर निविदा प्रक्रिये मध्ये सहभागी होण्यासाठी प्रिंटिग व्यवसाय करणा-या खालील बाबी असणे आवश्यक आहे.

१) DSC (Digital Signature Certificate)
२) https://mahatenders.gov.in या संकेतस्थळ/पोर्टलवर नोंदणीकृत असावा.
३) Shop & Establishment Act अंतर्गत नोंदणीकृत किंवा इतर सक्षम अधिकारी यांनीसदर व्यवसायासाठी नोंदणीकृत केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक.
४) PAN कार्ड असणे आवश्यक आहे.
५) VAT नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे अटिंची पुर्तता करणा-या इच्छुक पुरवठादारांनी त्यांच्या https://mahatenders.gov.in वर नोंदणीकृत केलेला ID तसेच वर नमुद केलेल्या कागदपत्रासह कार्यालयाच्या वर नमुद केलेल्या पत्यावर किंवा drdawashim@gmail.com या ई-मेल आयडीवर दिनांक २८ / ०२ / २०१७ , दुपारी ३ वा वाजेपर्यंत अर्ज सादर करण्यात यावा. कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक व्यवसायिकांकडुन कोणतीही निविदा शुल्क व EMD रक्कम घेण्यात येणार नाही.

**प्रकल्प संचालक**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,वाशिम**

**लेखा अधिकारी**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम**

**कार्यकारी अध्यक्ष**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,**
**वाशिम तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वाशिम**